# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र ८१** **दिनांक- ३१/०३/२०२१**

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०१ अल्पवयीन व इतर ०२ पिडित मुलींची सुटका केली.

दिनांक ३०.०३.२०२१ रोजी काशिमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दाराज ढाबा, निलकमल नाका, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, काशिमिरा ता.जि.ठाणे या ठिकाणी महिला वेश्यादलाल हि पुरुष ग्राहकांना वेश्यागमनासाठी मुली पुरविणार आहे. अशी गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली. त्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांनी पथकासह दाराज धाबा / हॉटेल काशिमीरा या ठिकाणी १४.१० वा. छापा टाकला असता वेश्या दलाल निशा उर्फ अमरजित जिसवंत सिंग कौर, वय-३० वर्षे, रा. रुम नं.१०१/बी, स्वागत हाईटस, हाटकेश, जी.जी.सी.क्लब जवळ, काशिमिरा, ता.जि.ठाणे मुळ रा. दिल्ली हि वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्विकारुन त्या मोबदल्यात मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाल्याने तिचेकडुन वेश्यगमनाकरीता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०१ अल्पवयीन मुलगी व इतर ०२ पिडित मुलींची सुटका करण्यात आली. सदर बाबत अटक आरोपी व पाहिजे आरोपी श्रध्दा पूर्ण नाव माहीत नाही यांच्या विरुध्द काशिमिरा पोलीस ठाणे येथे पो.हवा./१९८७ विजय विनायक ढेमरे यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली असून काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २६५/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३६६(अ), ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम४, ५, सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८, १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख,सहा. पोलीस आयुक्त,(गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,भाईंदर विभागाचे व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पो.हवा./१९८७ ढेमरे, पो.हवा./२२९८ निलंगे, म.पो.ना./१७८९ यंबर, म.पो.ना./२८४५ चव्हाण, पो.शि./३६६० शिंदे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner